सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १४ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. २० मे २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

## देशातील तरुण,छोटे उद्योजग रडतायत

# आणि... पंतप्रधान इटलीत टॉफी वाटतायत

### राहुल गांधी यांची टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०नवी दिल्ली**




लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी 'मेलोडी टॉफी'चा उल्लेख करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली आहे. मोदींनी इटली दौऱ्यात पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांना भेट म्हणून मेलोडी टॉफी दिल्या. तो संदर्भ घेऊन राहुल गांधींनी 'एक्स'वर एक पोस्ट केली. देशात शेतकऱ्यांपासून मजूरापर्यंत सगळे रडत आहेत, तर भाजपावाले टाळ्या वाजवत आहेत, अशी टिप्पणी त्यांनी केली आहे.

विरोधी पक्षनेते गांधी म्हणाले, आर्थिक वादळ उंबरठ्यावर आहे आणि आपले पंतप्रधान इटलीमध्ये चॉकलेट वाटत आहेत. शेतकरी, तरुण, महिला, मजूर आणि छोटे व्यापारी सगळेच रडत आहेत. पंतप्रधान हसत रील बनवत आहेत आणि भाजपावाले टाळ्या वाजवत आहेत. हे नेतृत्व नाहीये, तर नाटक आहे.

राहुल गांधींनी उत्तर प्रदेशातील रायबरेली येथे झालेल्या सभेतही केंद्रावर निशाणा साधला. तुम्ही आता सगळे टाळ्या वाजवत आहात. पण जेव्हा आरएसएसचे सदस्य तुमच्यासमोर संविधान फाडून फेकत होते, तेव्हा तुम्ही गप्प बसले होतात. मला तुम्हाला सांगायचं आहे की, हे संविधान तुमचा आवाज आणि तुमचे रक्त आहे, असे राहुल गांधी म्हणाले. संविधानाचे रक्षण करणे आणि त्याला सांभाळून ठेवणे हे आपले कर्तव्य आहे. नरेंद्र मोदी तुम्हाला सांगतात की, परदेशात जाऊ नका. तुम्हाला ते सोनं खरेदी करू नका म्हणून सांगतात. ते तुम्हाला इलेक्ट्रिक गाड्या घ्या म्हणतात. पण, पुढच्या काही काळात शेतकऱ्यांना खतेही मिळणार नाहीत. आपल्या दिशेने आर्थिक वादळ येत आहे. तुम्हाला ते पुढील काही महिन्यात दिसेल. महागाई वाढेल, पेट्रोल-डिझेलचे दर वाढतील, असा इशारा राहुल गांधींनी दिला

# पुढची २० वर्षे सुरक्षित झाली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०मुंबई-** राजकीय विचारसरणी आणि भूमिका वेगवेगळ्या असल्या तरी देशहिताच्या मुद्द्यावर कधीही राजकारण आणता कामा नये, अशा शब्दात शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या दौऱ्याबाबत भाष्य केलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे जागतिक स्तरावर भारताची मान उंचावण्याचे आणि देशाची प्रतिष्ठा जपण्याचेच काम करत आहेत, अशा शब्दांत पवारांनी मोदींच्या कार्यपद्धतीचे कौतुक केले. त्यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चा सुरु असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या भूमिकेचे स्वागत केले आहे.

मंगळवारी मुंबईत आयोजित लक्ष्मणराव गुट्टे ग्रामीण विकास संस्थेच्या एका विशेष सन्मान सोहळ्यात शरद पवार बोलत होते. यावेळी शरद पवार यांनी देशाच्या परराष्ट्र धोरणावर आणि नेतृत्वावर भाष्य केले. आज आपला देश एका नव्या आणि वेगळ्या वळणावर उभा आहे. आमचे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे राजकीय दृष्टिकोन नक्कीच भिन्न असू शकतात, परंतु आंतरराष्ट्रीय पातळीवर ते भारताची प्रतिमा अधिक मजबूत करत आहेत, हे सत्य कोणालाही नाकारता येणार नाही. जेव्हा देशाच्या अस्मितेचा आणि प्रतिष्ठेचा प्रश्न येतो, तेव्हा सर्व राजकीय पक्षांनी आपले हेवेदावे बाजूला ठेवले पाहिजेत, असं शरद पवार म्हणाले.



पवारांनी पुढे बोलताना देशाच्या माजी पंतप्रधानांचा दाखला दिला. इंदिरा गांधी, पी.व्ही. नरसिंहराव आणि डॉ. मनमोहन सिंग यांसारख्या महान नेत्यांनी नेहमीच देशाचे हित आणि जागतिक पातळीवरील भारताचे स्थान केंद्रस्थानी ठेवले होते. आज पंतप्रधान मोदी देखील त्याच मार्गाने देशाची प्रतिष्ठा वाढवण्याचे काम करत असल्याचे पवारांनी नमूद केले. समाजात काम करताना पक्षाच्या भिंती ओलांडून जनतेप्रती असलेल्या जबाबदारीची जाणीव प्रत्येकाने ठेवायला हवी, असा सल्लाही त्यांनी दिला.शरद पवारांच्या या वक्तव्यानंतर राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपली प्रतिक्रिया दिली. शरद पवारांसारख्या ज्येष्ठ नेत्याकडून आलेली ही प्रतिक्रिया अत्यंत परिपक्क आणि महत्त्वाची असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.शरद पवार यांनी जे सांगितले ते महत्त्वाचे आहे. ज्यावेळी अनेक लोक हे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे परदेशात का गेले, तिकडे काय होतंय अशी टीका करत होते. त्यावेळी ज्या प्रकारचे महत्त्वाचे करार वेगवेगळ्या देशांसोबत आज भारताने केले आहेत. पुढल्या २० वर्षांचे आपले भवितव्य हे या करारांमुळे सुरक्षित झालं आहे. म्हणूनच शरद पवार यांनी सांगितले की, विनाकारण टीका करु नका. पंतप्रधान परदेशात जाऊन देशाच्या हिताचे काम करत आहेत. त्यामुळे त्यांच्यावर टीका करणे योग्य नाही, असं मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

### शरद पवारांनी पंतप्रधान मोदींचे कौतुक केल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीसां कडून जोरदार स्वागत

# 'पॅनिक होऊन पेट्रोल-डिझेल खरेदी करू नका'

## तुटवड्याबद्दल अफवा, मुख्यमंत्री फडणवीसांचे नागरिकांना आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०मुंबई** मी लोकांना विनंती करतो की, जागतिक परिस्थिती वाईट असतानाही आपण आपली पुरवठा साखळी चांगली ठेवली आहे. पण, आपण जर घाबरून पेट्रोल-डिझेल खरेदी केली तर पुरवठा साखळी नीट राहू शकणार नाही, असे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातून येत असलेल्या पेट्रोल-डिझेल तुटवड्याच्या घटनांवर सविस्तर भाष्य केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, वारंवार केंद्र सरकारने सांगितले आहे की, पेट्रोल-डिझेलचा स्ट्रेटजिक साठा आमच्याकडे आहे. त्याचा पुरवठादेखील योग्य प्रमाणात होत आहे. पण, विनाकारण भीती तयार होतेय. लोकांमध्ये पॅनिक तयार झाल्यानंतर आपली पुरवठा साखळी कशी असते, तर वर्षानुवर्षे चालत असलेली असते. त्यामुळे एखाद्या पेट्रोल पंपावर किंवा एखाद्या तालुक्यात वर्षानुवर्षे महिन्याला किती पेट्रोल लागते. दिवसाला किती पेट्रोल लागते, या आधारावर पुरवठा साखळी तयार झालेली असते.

**तेव्हा पेट्रोल-डिझेल पुरवठा साखळी विस्कळीत होते**

पुढे बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, मग अचानक जेव्हा अफवांवर आधारित लोक जास्त पेट्रोल भरणे सुरू करतात, तेव्हा ती पुरवठा साखळी विस्कळीत होते. याचा अर्थ साठा कमी आहे असे नाहीये. पण, अशा प्रकारच्या भीतीमुळे उदाहरण म्हणून लोकांनी एकाच दिवशी पैसे काढणे सुरू केले तर ती बँक पैसे देऊ शकत नाही कारण त्यांचे पैसे गुंतवलेले असतात. तशीच परिस्थिती आहे.



**घाबरून जाऊन पेट्रोल डिझेल खरेदी करू नका**

मी लोकांना विनंती करतो की, जागतिक परिस्थिती वाईट असतानाही आपण आपली पुरवठा साखळी चांगली ठेवली आहे. पण, आपण जर घाबरून पेट्रोल-डिझेल खरेदी केली तर पुरवठा साखळी नीट राहू शकणार नाही. त्यात व्यत्यय येईल. त्यामुळे सगळ्यांनी पेट्रोल काळजीपूर्वक वापरावं आणि पुरवठा साखळी विस्कळीत करू नये. अफवांवर विश्वास ठेवू नये, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

दरम्यान, राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी राज्यात एक महिन्याचा साठा असल्याची माहिती दिली. पेट्रोल-डिझेलचा प्रश्न हा जागतिक आहे, हा प्रश्न मुंबई, पुणे किंवा महाराष्ट्राचा नाही. अमेरिका- इराण यांच्या युद्धामुळे संपूर्ण जगाचा पुरवठा विस्कळीत झाला आहे, असे भुजबळ यांनी सांगितले.

## अमरावती रेल्वे स्थानकाजवळील

# ८११५ चौ.मी. जमीन 'आय डिस्कव्हरी'ला ४५ वर्षांसाठी भाडेपट्ट्यावर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० अमरावती**




अमरावती येथील रेल्वे स्थानक परिसरातील इर्विन स्क्वेअर भागातील ८११५ चौरस मीटर जमीन खासगी कंपनीला भाडेपट्ट्यावर देण्यात आल्याची माहिती माहिती अधिकार कायदा २००५ अंतर्गत समोर आली आहे. केंद्रीय रेल्वेच्या भुसावळ विभागाकडून ही माहिती अर्जदार अजय बसुदेव बोस यांना देण्यात आली.भुसावळ विभागाचे जन माहिती अधिकारी (इंजिनिअरिंग) यांनी १९ एप्रिल २०२४ रोजी दिलेल्या पत्रानुसार, अमरावती रेल्वे स्थानकाजवळील ही जमीन एम/एस आय डिस्कव्हरी कंपनीला ४५ वर्षांच्या कालावधीसाठी लीजवर देण्यात आली आहे. या जमिनीचा एकूण लीज प्रीमियम तब्बल ४१ कोटी ८६ लाख ३० हजार ९५२ रुपये इतका निश्चित करण्यात आला असल्याचे स्पष्ट करण्यात आले.माहिती अधिकारांतर्गत विचारण्यात आलेल्या प्रश्नांमध्ये लीजचा कालावधी, जमीन कोणत्या दराने देण्यात आली आणि आतापर्यंत रेल्वेला किती रक्कम प्राप्त झाली यासंदर्भातील माहिती मागविण्यात आली होती. त्यावर रेल्वे प्रशासनाने अधिकृत उत्तर देत जमीन ४५ वर्षांसाठी देण्यात आल्याचे नमूद केले आहे.दरम्यान, शहराच्या मध्यवर्ती भागातील एवढ्या मोठ्या जागेच्या भाडेपट्ट्याबाबत नागरिकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली असून, या प्रकल्पामुळे भविष्यात परिसराच्या विकासाला चालना मिळणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तसेच लीज करारातील अटी व प्रकल्पाचे स्वरूप याबाबत अधिक माहिती सार्वजनिक करण्याची मागणीही काही नागरिकांकडून होत आहे.

# ऑनलाईन औषध विक्री बंद करा; कॉर्पोरेट डिस्काउंटवरही बंदीची मागणी

## अमरावती जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती :** देशभरात ऑनलाईन औषध विक्री, ई-फार्मसी आणि कॉर्पोरेट कंपन्यांच्या वाढत्या वर्चस्वाविरोधात बुधवारी (दि.२०) अमरावती जिल्ह्यातील औषध विक्रेत्यांनी एकजूट दाखवत 'ऑल इंडिया केमिस्ट्स बंद'मध्ये सहभाग नोंदविला. अमरावती डिस्ट्रिक्ट केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या नेतृत्वात शहरातील बहुतांश मेडिकल दुकाने बंद ठेवण्यात आली होती. ऑनलाईन औषध विक्री बंद करा, कॉर्पोरेट्सद्वारे अव्यावसायिक डिस्काउंट थांबवा आणि बनावट औषधांपासून देश वाचवा अशा मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले.असोसिएशनचे अध्यक्ष सौरभ मालाणी, सचिव राजा नानवानी यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांची भेट घेत



शासनाचे लक्ष वेधले. यावेळी औषध विक्रेत्यांनी काळ्या पट्ट्या बांधून निषेध नोंदविला. ऑनलाईन औषध विक्रीमुळे स्थानिक मेडिकल व्यवसाय धोक्यात येत असून नकली औषधांचा धोका वाढत असल्याची भूमिका संघटनेने मांडली.दरम्यान, बंदच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना अत्यावश्यक औषधे मिळावीत यासाठी दवा बाजार-महावीर प्लाझा येथे २६ हेल्पलाईन क्रमांक कार्यान्वित करण्यात आले. रायली प्लॉट येथून आवश्यक औषध सेवा उपलब्ध करून देण्यात आली. एआयओसीडी व स्थानिक संघटनेच्या पुढाकारामुळे अनेक गरजूंना दिलासा मिळाला .संघटनेच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाठविण्यात आलेल्या निवेदनाची प्रतही जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करण्यात आली. यावेळी केमिस्ट एकता जिंदाबादच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला. स्थानिक केमिस्ट टिकला तरच सुरक्षित व विश्वासार्ह औषध वितरण व्यवस्था मजबूत राहील, असे मत सौरभ मालाणी, संजय बोबडे व सौ. अरुणा चौधरी यांनी व्यक्त केले.

# मुंबईच्या धर्तीवर अमरावतीत कोंडेश्वर फिशरीज हब, चिखलदरा स्कायवॉक बेलोरा विमानतळ नाईट फ्लाईटसह विविध विकास प्रकल्पांना गती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० अमरावती,** बॉटम अध्यक्ष विधानसभा आश्वासन समिती तथा आमदार रवी राणा यांच्या पुढाकारातून अमरावती जिल्ह्यातील विविध विकास प्रकल्पांना गती देण्यासाठी मंत्रालयात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे प्रमुख उपस्थित होते.बैठकीत अमरावती शहरातील कोंडेश्वर येथे मुंबईच्या धर्तीवर अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज फिशरीज हब विकसित करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. हा प्रकल्प प्रभावीपणे राबविण्यासाठी सक्षम व व्यावसायिक संस्था अथवा एजन्सीची नियुक्ती करण्याचे निर्देश संबंधित विभागाला देण्यात आले. या प्रकल्पामुळे मत्स्यव्यवसायाला चालना मिळण्यासोबतच स्थानिक स्तरावर रोजगारनिर्मिती आणि आर्थिक विकासाला मोठी मदत होणार असल्याचे बैठकीत नमूद करण्यात आले.याशिवाय, चिखलदरा येथील प्रस्तावित स्कायवॉक प्रकल्प तातडीने पूर्ण करून पर्यटन विकासाला चालना




देण्याबाबतही चर्चा झाली. तसेच बेलोरा विमानतळावरील नाईट व्हिजन सुविधा लवकर पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. सकाळी व रात्री विमान सेवा सुरू करण्यासंदर्भातही सकारात्मक चर्चा करण्यात आली.बैठकीत पायलट ट्रेनिंग स्कूल, स्टेट्स स्टाईल पार्क तसेच एमआयडीसी आयटी पार्क प्रकल्पांचाही आढावा घेण्यात आला. विविध विकासकामे वेळेत पूर्ण करण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश पालकमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना दिले.दरम्यान, आमदार रवि राणा यांनी अचलपूर येथे अपर जिल्हाधिकारी कार्यालय सुरू करणे, अमरावती शहर व ग्रामीण तहसील विभाजनाची अंमलबजावणी, तसेच चूरणी तहसील कार्यालय सुरू करण्यास मंजुरी मिळाल्याची माहिती दिली.या बैठकीस डॉ. रामास्वामी, सचिव प.दु.म., श्रीमती देशभ्रतार, मत्स्यव्यवसाय आयुक्त श्री प्रकाश खपले, एमएफडीसीचे व्यवस्थापकीय संचालक तसेच श्री प्रवीण महाजन उपस्थित होते.

# कांदा शेतकऱ्यांना तर भाजीपाला गृहिणींना रडवतोय; भाजीपाला, दूध, किराणा मालाच्या किंमतीत वाढ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०मुंबई** सलग होत असलेल्या पेट्रोल आणि डिझेलच्या दरवाढीची झळ आता सर्वसामान्यांच्या स्वयंपाकघरापर्यंत पोहोचली आहे. शुक्रवारी (दि.१५) तीन रुपये व मंगळवारी (दि.१९) एक रुपये डिझेलच्या किमती वाढल्यामुळे मालवाहतूक खर्च वाढला आहे. परिणामी, दररोज लागणारे दूध, पाव, पालेभाज्या आणि किराणा माल महागला आहे. एकीकडे महागाईने गृहिणींचे बजेट कोलमडले असताना, दुसरीकडे कांद्याचे भाव मातीमोल झाल्याने राज्यातील शेतकरी हवालदिल झाला आहे. उत्पादन खर्चही निघत नसल्याने बळीराजा संकटात सापडला आहे.

शेतातून मुख्य बाजारापर्यंत आणि तिथून किरकोळ विक्रेत्यांपर्यंत भाजीपाला पोहोचवण्याचा खर्च वाढल्याने टोमॅटो, कोबी, आणि इतर पालेभाज्यांचे भाव गगनाला भिडले आहेत. ग्रामीण भागातून दूध संकलन करणाऱ्या आणि शहरात वितरण करणाऱ्या गाड्या डिझेलवर चालतात. यामुळे दूध, दही, पनीर आणि तूप महागले आहे. गहू, तांदूळ आणि डाळींची इतर राज्यांतून होणारी वाहतूक महागली आहे. तसेच परदेशातून येणाऱ्या खाद्यतेलाचा वाहतूक खर्च वाढल्याने कढईतले तेल महाग झाले आहे. कपडे-भांड्यांचे साबण, डिटर्जंट पावडर आणि महिलांची सौंदर्यप्रसाधने व सॅनिटरी नॅपकिन्सच्या किमती कंपन्यांनी वाहतूक खर्च वाढल्याचे सांगून वाढवत आहेत.

संपादकीय ......

# शिक्षण माफियांना फासावर लटकवा

*वैद्यकीय प्रवेशासाठी अत्यंत महत्त्वाची आणि प्रतिष्ठेची मानली जाणारी 'नीट' परीक्षा २०२६ मोठ्या वादाच्या भोवर्यात सापडली आहे. देशातील लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य पणाला लावणार्या या परीक्षेत पेपरफुटी आणि गैरव्यवहार प्रकरणाचे धागेदोरे आता थेट महाराष्ट्रापर्यंत येऊन पोहोचले आहेत. केंद्रीय अन्वेषण विभागाने या प्रकरणात केलेल्या धडक कारवायांमुळे महाराष्ट्रातील पुणे, नाशिक आणि लातूर यांसारखी शैक्षणिक केंद्रे या महाघोटाळ्याचे केंद्रबिंदू ठरत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. २०२४ मध्येही पेपरफुटीचे प्रकरण समोर आले होते. तेव्हा सरकारने काय कारवाई केली हे अद्याप समोर आलेले नाही. नीट पेपरफुटीच्या घोटाळ्याचे स्वरूप आणि महाराष्ट्र कनेक्शन अतिशय गडद, घट्ट होताना दिसत आहे. मे २०२६ मध्ये पार पडलेल्या नीट परीक्षेच्या काही दिवस आधीच, म्हणजेच २७ एप्रिल रोजी प्रश्नपत्रिका आणि त्यांची उत्तरे फुटल्याचा संशय सीबीआयच्या तपासात व्यक्त करण्यात आला. राष्ट्रीय परीक्षा एजन्सीच्या (एनटीए) गोपनीय पॅनलमधील काही सदस्यांच्या मदतीने संघटित टोळ्यांनी हा पेपर फोडला. या संपूर्ण रॅकेटमध्ये महाराष्ट्रातील काही हाय-प्रोफाईल संशयितांची नावे समोर आल्याने राज्याच्या शैक्षणिक वर्तुळाबद्दल संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे.*

*या घोटाळ्यातील महाराष्ट्र कनेक्शनची प्रमुख चार पात्रे आहेत. यातील तिघांची शैक्षणिक पार्श्वभूमी आहे. मात्र एक महिला ही ब्यूटी पार्लर चालवते. त्या माध्यमातून तिने अनेकांशी संपर्क निर्माण केला. तिच्या संपर्कामधून एनटीएचे पॅनल सदस्य प्रा. मनीषा मांढरे, निवृत्त प्राध्यापक प्रल्हाद व्ही. कुलकर्णी या मुख्य सूत्रधारांनी नीटचा पेपर फोडला. सीबीआयच्या रडारवर असलेली मनीषा मांढरे ही एनटीएच्या पॅनलमध्ये होती. शासकीय यंत्रणेत असलेल्या पदाचा गैरवापर करून तिने परीक्षेपूर्वीच प्रश्नपत्रिका फोडल्याचा प्राथमिक आरोप आहे. निवृत्त प्राध्यापक प्रल्हाद व्ही. कुलकर्णी याला पुण्यातून अटक करण्यात आली. तेदेखील नीट पेपर सेटर होते. त्यांनी आपल्या जुन्या ओळखींचा आणि प्रभावाचा वापर करून प्रश्नपत्रिका मिळवली आणि ती पुढे पोहोचवण्याचे काम केले. मुळची पुण्याची असलेली आणि ब्युटी पार्लर चालवणारी मनीषा वाघमारे ही या साखळीतील अत्यंत महत्त्वाचा दुवा आहे. सीबीआयच्या आरोपानुसार, मनीषाने 'एनटीए'च्या अंतर्गत गोटातून फुटलेला पेपर मध्यस्थांच्या मदतीने हस्तगत केला. त्यानंतर तिने पुणे आणि नाशिक परिसरातील गरजू व श्रीमंत उमेदवारांचे नेटवर्क तयार करून कोट्यवधी रुपयांच्या बदल्यात हा पेपर विकला. पुरावे नष्ट करण्यासाठी तिने नंतर प्रश्नपत्रिकांची विल्हेवाट लावल्याचाही आरोप आहे. शिक्षण क्षेत्र आता कोट्यवधींचा बाजार झाला आहे. त्यात महाराष्ट्रात वैद्यकीय शिक्षणाची मोठी ओढ. लातूर, पुणे शहरात नीटच्या कोचिंगसाठी राज्यभरातून विद्यार्थी येतात. याच गोष्टीचा गैरफायदा या घोटाळेबाजांनी घेतला. एका-एका विद्यार्थ्याकडून पेपर देण्यासाठी ३० ते ५० लाख रुपयांची मागणी करण्यात आली. पालकांकडून आगाऊ रकमा घेऊन त्यांना परीक्षेच्या अवघ्या २४ तास आधी पुण्याच्या आणि नाशिकसह देशभरातील अनेक ठिकाणी गुप्तपणे बोलावून प्रश्नोत्तरे देण्यात आली. शिवराज मोटेगावकर याने तर कळस केला आहे. शेतकरी कुटुंबातून आलेला मोटेगावकर एम.एस्सी. रसायनशास्त्रात सुवर्णपदक विजेता आहे. लातुरात कोचिंग क्लास सुरू केला आणि शेतकर्यांच्याच मुलांच्या भवितव्याशी त्याने खेळ सुरू केला. प्रल्हाद कुलकर्णी, मनीषा मांढरे यांसारख्याच्या मदतीने जो अधिक पैसे देईल त्यांना नीटची प्रश्नोत्तरे देऊन गरीब, होतकरू, अभ्यासू विद्यार्थ्यांवर अन्याय सुरू केला. परीक्षेला काही अर्थच उरला नाही. दहा दिवस आधी ठरावीक विद्यार्थ्यांना सराव परीक्षेच्या नावाने परीक्षेचा पेपर देण्यात येत होता. एनटीएची ही तटबंदी बाहेरून नाही तर आतूनच भेदण्यात आली. याला एनटीएचे अधिकारीही तेवढेच जबाबदार आहेत. पैशांच्या आमिषापुढे त्यांनी लाखो विद्यार्थी, पालकांच्या स्वप्नांचा बाजार मांडला.*

*या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून केंद्र सरकारने पेपरफुटीचा तपास सीबीआयकडे सोपवला. दिल्लीच्या राऊज ॲव्हेन्यू कोर्टाने मनीषा वाघमारे, मनीषा मांढरे, प्रल्हाद व्ही. कुलकर्णी, मोटेगावकर यांच्यासह अनेक आरोपींना सीबीआय कोठडी सुनावली आहे. डिजिटल पुरावे, बँक खात्यांचे व्यवहार आणि कॉल डिटेल्स याद्वारे सीबीआय या घोटाळ्याचे मूळ शोधत आहे. या गैरव्यवहारामुळे प्रामाणिकपणे अभ्यास करणार्या विद्यार्थ्यांवर मोठा अन्याय झाला असून, 'एनटीए'च्या विश्वासार्हतेवर पुन्हा एकदा मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नीट पेपरफुटीत महाराष्ट्राच्या नावाला मात्र काळिमा फासण्याचे काम या तथाकथित शिक्षकांकडून करण्यात आले. खरं तर हे शिक्षक नसून शैक्षणिक माफिया आहेत. दुर्दैवाने त्यांचे मूळ महाराष्ट्रात आहे. पैशांच्या बळावर डॉक्टर बनू पाहणार्या प्रवृत्ती आणि त्यांना खतपाणी घालणारे एजंट हे देशाच्या आरोग्य व्यवस्थेसाठीही घातक आहेत. भविष्यात अशा घटना रोखण्यासाठी केवळ वरवरची कारवाई करून चालणार नाही, तर परीक्षा पद्धतीत आमूलाग्र बदल करणे आणि या घोटाळ्यातील आरोपींना फाशी किंवा जन्मठेपेसारखी शिक्षा देणे गरजेचे आहे. तरच लाखो प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या कष्टाला न्याय मिळेल. पुन्हा कोणी असा गुन्हा करण्यास धजावणार नाही. मात्र सरकारकडून अशा प्रकरणातील २०२४ चा अनुभव दुर्दैवाने वाईट आहे, त्यामुळे या शिक्षण माफियांना खरंच काळ कोठडी मिळणार का, याबद्दल साशंकताच आहे.*

# कृषी वीजपंप जोडण्या रखडल्या

## ११ जूनपर्यंत सर्व प्रलंबित जोडण्या पूर्ण करण्याचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**
अंजनगावबारी परिसरात कृषी वीजपंप जोडणीचे काम गेल्या काही महिन्यांपासून ठप्प असल्याने शेतकरी मोठ्या अडचणीत सापडले आहेत. त्यामुळे तातडीने वीजजोडण्या देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. भाजीपाला, फळबाग तसेच इतर पिकांसाठी ओलित करणे अत्यावश्यक आहे. मात्र वीजजोडण्या नसल्याने पिकांना पाणी देता येत नाही. याकरिता अनेक शेतकऱ्यांनी अंजनगावबारी उपकेंद्रात वीजजोडणी मिळण्यासाठी अर्ज केले. मात्र ते अर्ज मागील कित्येक दिवसांपासून प्रलंबितच असल्याची तक्रार आहे. शेतकऱ्यांनी नियमानुसार अर्ज दाखल करून शुल्क भरले असतानाही जोडण्या मिळत नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे. संबंधित कनिष्ठ अभियंत्यांकडून होत असलेल्या दुर्लक्षामुळे अनेकांना वारंवार कार्यालयाच्या चकरा माराव्या लागत असूनही ठोस निर्णय होत नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. परिसरातील अनेक भागांत नैसर्गिक पाणीस्रोत मर्यादित असल्याने कृषी वीजजोडणी ही शेतीसाठी जीवनवाहिनी मानली जाते. वीजअभावी ओलिताची समस्या निर्माण झाली आहे. वेळेत वीजपुरवठा न झाल्यास भाजीपाला उत्पादनात मोठी घट होण्याची भीती शेतकरी व्यक्त करीत आहेत. दरम्यान, गावागावांतून वरिष्ठ अधिकाऱ्यांचे लक्ष वेधण्याचे प्रयत्न सुरू असून प्रलंबित अर्ज तातडीने मंजूर करण्याची मागणी जोर धरत आहे. आणखी विलंब झाल्यास आंदोलनाचा इशाराही शेतकऱ्यांनी दिला आहे. नियमानुसार अर्ज करूनही वीजजोडणी न मिळाल्याने दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने ११ जून पर्यंत सर्व प्रलंबित कृषी वीज जोडण्या पूर्ण करण्याचे आदेश दिले. वीज ही जगण्यासाठीची लाइफलाइन आहे, ती न देणे म्हणजे शेतकऱ्यांच्या आयुष्याशी खेळ, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदविले आहे.

या निर्णयामुळे अमरावती जिल्ह्यासह धारणी व मेळघाटातील अनेक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



अलीकडील काळात कृषी वीजजोडणीसाठी अर्जांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. उपलब्ध मनुष्यबळ आणि साहित्य (केबल, खांब, डीपी) यांचा तुटवडा असल्यामुळे काही प्रस्ताव प्रलंबित राहिले आहेत. तसेच नव्या लाइन विस्तारासाठी तांत्रिक मंजुरी आणि बजेट मंजुरीला वेळ लागतो. तरीदेखील सर्व प्रलंबित कृषी वीजजोडण्या टप्प्याटप्याने पूर्ण करण्यासाठी आम्ही प्राधान्याने काम करीत आहोत. **-अंकुश सोनोने,** कनिष्ठ अभियंता, अंजनगावबारी.

# शुक्रवारपर्यंत उष्णतेचा 'ऑरेंज अॅलर्ट'

## नागरिकांनी सतर्क राहण्याचे प्रशासनाचे आवाहन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती** वाढत्या तापमानामुळे जिल्हा अक्षरशः होरपळत असून पुढील काही दिवस नागरिकांना उष्णतेच्या तीव्र झळा सहन कराव्या लागणार आहेत. भारतीय हवामानशास्त्र विभाग यांनी जिल्ह्यात २२ मे पर्यंत उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे. उष्णतेच्या वाढत्या तीव्रतेमुळे लहान मुले, वृद्ध, गर्भवती महिला तसेच आजारी व्यक्तींना विशेष धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे नागरिकांनी शक्यतो दुपारी १२ ते ४ या वेळेत घराबाहेर पडणे टाळावे, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. उन्हाळ्यात शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होऊ नये म्हणून भरपूर पाणी, ओआरएस, लिंबूपाणी, ताक आणि फळांचे सेवन करण्याचा सल्ला देण्यात आला आहे. नागरिकांनी हलक्या रंगाचे सुती कपडे वापरणे, डोक्यावर टोपी, गमछा किंवा छत्रीचा वापर करणे तसेच बंद वाहनांमध्ये मुले किंवा प्राणी ठेवू नयेत, अशा सूचनाही दिल्या आहेत. उष्णतेच्या लाटेमुळे अचानक तब्येत बिघडणे, चक्कर येणे, थकवा किंवा उष्माघाताचा धोका वाढत असल्याने नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. बांधकाम, शेती, रस्ते कामे आणि औद्योगिक क्षेत्रातील कामगारांना थेट उन्हात सलग काम टाळण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

# धामणगावात तीळ, मूग, ज्वारी खरेदीला प्रारंभ

## मुहूर्तावर तिळाला मिळाला १० हजार ८११ रुपयांचा भाव

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०धा.रेल्वे**
येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत तीळ, मूग व ज्वारी खरेदीला मंगळवारी (ता.१९) प्रारंभ करण्यात आला. मुहूर्तावर तिळाला प्रति क्विंटल १० हजार ८११ रुपयांचा भाव मिळाला. त्यामुळे तीळ उत्पादकांना दिलासा मिळाला. धामणगाव व परिसरातील शेतकऱ्यांना तीळ विक्रीकरिता अमरावती, यवतमाळ, नागपूर याठिकाणी जावे लागत होते. तेथे गेल्यानंतर मिळेल त्या भावात तीळ विकावे लागत होते. शेतकऱ्यांची होत असलेली असुविधा लक्षात घेता मंगळवारला (ता.१९) बाजार समितीच्या श्री छत्रपती शिवाजी महाराज बाजार आवारात तीळ खरेदीला प्रारंभ करण्यात आला. यावेळी बाजार समितीच्या सभापती कविता गावंडे, उपसभापती संगीता गाडे, जिल्हा बँकेचे संचालक श्रीकांत गावंडे, संचालक दिनेश जगताप, सचिन सोमोसे, विलास भिल, देवराव बमनोटे,



संदीप दावेदार, राधेश्याम चांडक, गिरीश भुतडा, खरेदी-विक्री संघाचे उपाध्यक्ष प्रदीप मुंदडा, तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष पंकज वानखडे, सुधीर शेळके, खरेदी-विक्री संघाचे संचालक सुनील भोगे, गणेश धवणे, आशिष भोगे तसेच खरेदीदार मनीष भट्टड, संजय अग्रवाल, आबू अग्रवाल, सचिन राठी, सचिन गंगन, तेजस दुबे, राजेश गंगन, मनीष केला, पवन लाहोटी, नरेंद्र राठी, रितेश राठी, रामदास राजनकर आदी उपस्थित होते. दरम्यान, जय माँ ट्रेडर्स यांच्या खरेदीमध्ये तिळाला १० हजार ८११ रुपयांचा, तर गुंजी येथील शेतकरी प्रकाश कडे यांच्या मूगाला सात हजार ५०० रुपये दर मिळाला. याप्रसंगी प्रकाश कडे, मारोतराव मोकुलकर, अतुल राऊत या शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर बाजार समितीच्या यार्डकरिता ई-रिक्षाचे लोकार्पण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

# बाजार समितीच्या सभापतिपदी राजेंद्र राजनेकर विजयी उपसभापतिपदी प्रशांत कोल्हे यांची बिनविरोध निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९चांदूररेल्वे**
स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती व उपसभापती पदाची निवडणूक मंगळवारी (ता. १९) पार पडली. यामध्ये सभापतिपदी राजेंद्र राजनेकर विजय झाले, तर उपसभापतिपदी प्रशांत कोल्हे यांची बिनविरोध निवड झाली. या अत्यंत महत्त्वाच्या निवडणुकीकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागून होते. सभापति पदासाठी राजेंद्र राजनेकर आणि अतुल चांडक यांचे दोन अर्ज प्राप्त झाले होते. त्यानंतर झालेल्या अत्यंत चुरशीच्या मतदान प्रक्रियेत राजेंद्र राजनेकर यांना १२ मते मिळाली, तर प्रतिस्पर्धी अतुल चांडक यांना तीन मते



मिळाली. मतदानादरम्यान दोन संचालक तटस्थ राहिले, तर एक संचालक गैरहजर होते. बहूमताच्या जोरावर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी राजेंद्र राजनेकर यांची सभापती म्हणून घोषणा केली, तर उपसभापति पदासाठी प्रशांत कोल्हे यांचा एकमेव अर्ज दाखल झाला होता. त्यांच्या विरोधात एकही अर्ज न आल्याने निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी प्रशांत कोल्हे यांची उपसभापतिपदी बिनविरोध निवड झाल्याचे अधिकृत घोषणा केली. यावेळी सहकाऱ्यांकडून जल्लोष करण्यात आला. निवडणुकीची अधिकृत घोषणा होताच नवनियुक्त सभापती राजेंद्र राजनेकर व उपसभापती प्रशांत कोल्हे यांचे उपस्थित सर्व संचालक, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी पुष्पहार घालून, फटाक्यांची आतषबाजी करीत जोरदार स्वागत केले. या निवडणुकीत निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून किशोर इंगळे यांनी काम पाहिले. दरम्यान नवनियुक्त सभापती व उपसभापती यांनी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या हितासाठी आणि बाजार समितीच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहण्याची ग्वाही दिली. याप्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सर्व नवनियुक्त संचालक उपस्थित होते.

# वरुडच्या पाणीपुरवठा योजनेला मिळणार गती



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०वरुड,** शहरासाठी पंढरी मध्यम प्रकल्पावरून राबविण्यात येत असलेल्या महत्त्वाकांक्षी पाणीपुरवठा योजनेतील जलवाहिनीच्या कामाला रेल्वेविभागाकडून आलेला अडथळा दूर करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. यासंदर्भात आज संयुक्त पाहणी करण्यात आली. या पाहणीदरम्यान नगराध्यक्ष ईश्वर सलामे, स्वच्छता सभापती विनय खासबागे, संदीप ऊर्फ बंटी देवते, नीतेश धुर्वे, राहुल आगरकर, नरेंद्र उपरकर, दुर्गादास शेगेकर, मुरलीधर पवार, प्रकाश माळेदे तसेच नगरपरिषदेचे पाणीपुरवठा अभियंता, नगरसेवक आणि रेल्वे विभागाचे संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. रेल्वेच्या हद्दीतून जाणाऱ्या जलवाहिनीसाठी आवश्यक परवानगी मिळविण्याच्या दृष्टीने जागेची मोजणी करण्यात आली तसेच विविध तांत्रिक बाबींची तपासणी करण्यात आली. यावेळी रेल्वे अधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत परवानगीची प्रक्रिया लवकरच पूर्ण करून कामाला गती देण्याचे आश्वासन दिले. ही पाणीपुरवठा योजना मार्गी लागल्यास वरुड शहरातील नागरिकांचा दीर्घकालीन पाणीप्रश्न कायमस्वरूपी सुटण्यास मोठी मदत होणार असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## मार्च २६ अवकाळी पाऊस नुकसानग्रस्तांना दिलासा

# विभागातील ५६१ शेतकऱ्यांना ३६.३४ कोटींचा निधी

## निधी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीतून वितरित होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**
मार्च २०२६ मध्ये राज्यातील विविध भागांत झालेल्या अवकाळी पावसामुळे नुकसानग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना राज्य शासनाने मोठा दिलासा दिला आहे. अमरावती विभागात अमरावती, यवतमाळ व वाशिम या तीन जिल्ह्यातील ५६१ बाधित शेतकऱ्यांसाठी ३६ कोटी ४३ लाख रुपयांच्या मदत निधीस मंजुरी दिली आहे. हा निधी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीतून वितरित करण्यात येईल. महसूल व वन विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला. विभागीय आयुक्तांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार ही मदत मंजूर करण्यात आली आहे. अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतीपिकांसाठी शेतकऱ्यांना अनुदान स्वरूपात मदत देण्यात येईल. ही मदत थेट लाभ हस्तांतरण प्रणालीद्वारे शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होईल. तसेच एका हंगामात एकदाच मदत दिली जाईल, अशी स्पष्ट सूचना दिली आहे. यासोबतच दुबार मदत होणार नाही याची काळजी तहसीलदार आणि जिल्हाधिकारी यांनी घ्यावी, असे निर्देश शासनाने दिले आहेत. लाभार्थ्यांची यादी संबंधित जिल्ह्यांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार असून मदतीची रक्कम बँकांनी कर्ज वसुलीसाठी वळती करूनये, असेही स्पष्टकरण्यात आले आहे. महसूल विभागाने नैसर्गिक आपत्तीतील मदतीसाठीनिश्चितकेलेल्यानिकषांनुसारहा निधी खर्च करण्यात येणार असून संबंधित विभागीय आयुक्तांवर अंमलबजावणीची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

# सर्व विषय पदवीधर शिक्षकांना सरसकट वेतनश्रेणी द्या

## प्राथमिक शिक्षक समितीची शासनाकडे मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती-** उच्च प्राथमिक वर्गातील सर्व विषय पदवीधर शिक्षकांना सरसकट पदवीधर वेतनश्रेणी लागू करावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने शासनाकडे केली आहे. 'समान कामासाठी समान वेतन' या तत्त्वानुसार उच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करावी, असे निवेदन समितीने शालेय शिक्षण विभागाला दिले आहे. शिक्षण विभागाच्या १४ नोव्हेंबर १९७९ च्या शासन निर्णयानुसार उच्च प्राथमिक वर्गासाठी पदवीधर शिक्षक पदे निर्माण करण्यात आली होती. त्यानंतर शिक्षण हक्क कायदा २००९ नुसार गणित-विज्ञान, भाषा व सामाजिक शास्त्र, या विषयांसाठी स्वतंत्र पदे अस्तित्वात आली. मात्र, प्रत्येक विषयासाठी केवळ ३३ टक्के पदांनाच पदवीधर वेतनश्रेणी देण्याचा निर्णय घेण्यात आला. हा निर्णय भेदभावपूर्ण असल्याचा आरोप शिक्षक समितीने केला आहे. प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे, राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे, शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांना निवेदन पाठविले आहे. नागपूर खंडपीठाने ८ मे २०२६ रोजी दिलेल्या निर्णयात १३ ऑक्टोबर २०१६ चा शासननिर्णय भेदभावपूर्ण व संविधानाच्या कलम १४ चे उल्लंघन करणारा असल्याचे नमूद केले आहे. याचिकाकर्त्या शिक्षकांना नियुक्ती दिनांकापासून एस-१४ वेतनश्रेणी लागू करून थकबाकी द्यावी तसेच राज्यातील इयत्ता सहावी ते आठवीला शिकविणाऱ्या सर्व विषय पदवीधर शिक्षकांना पूर्वलक्षी प्रभावाने वेतनश्रेणी लागू करावी, अशी मागणी शिक्षक समितीने केली आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# डॉ. सुनील देशमुख यांच्या नेतृत्वात शहरातील ढासळलेल्या ट्रॅफिक व्यवस्थेचे पोस्टमार्टम

## नागरिकांना सुरक्षित रस्ते वाहतुकीची गरज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० अमरावती**





शहरातील दिवसेंदिवस बिघडत चाललेल्या वाहतूक व्यवस्थेबाबत तीव्र चिंता व्यक्त करत माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख यांच्या नेतृत्वाखाली शहरातील प्रसारमाध्यमे, डॉक्टर्स, व्यापारी, विधीज्ञ व विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या शिष्टमंडळाने पोलिस आयुक्त राकेश ओला यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. शहरातील वाढती वाहतूक कोंडी, बेशिस्त वाहनचालक, अतिक्रमणांचा विळखा आणि ट्रॅफिक पोलिसांच्या निष्क्रियतेमुळे सर्वसामान्य नागरिकांचे जीवन धोक्यात आले असल्याचे या वेळी नमूद करण्यात आले.गेल्या काही वर्षांत अमरावती शहराची लोकसंख्या आणि वाहनांची संख्या झपाट्याने वाढली आहे. मात्र, वाहतूक नियंत्रणासाठी आजही पारंपरिक आणि विस्कळीत पद्धतींचाच वापर होत असल्याने शहरातील ट्रॅफिक व्यवस्था पूर्णपणे कोलमडल्याचे चित्र आहे. मुख्य चौकांमध्ये स्वयंचलित सिग्नल व्यवस्था असतानाही तेथे ट्रॅफिक पोलिसांची अनुपस्थिती असल्याने वाहनचालक सिग्नल तोडून बेदरकारपणे वाहने चालवत असल्याचे शिष्टमंडळाने निदर्शनास आणून दिले.या चर्चेदरम्यान शहरातील बाजारपेठांमधील अतिक्रमणे, उड्डाणपुलाखालील घुमंतूंचे वास्तव्य, रस्त्यांवर बिनधास्त उभ्या राहणाऱ्या हातगाड्या व हॉकर्समुळे पादचारी आणि वाहनधारकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत असल्याची तक्रार करण्यात आली. कठोरा नाका, शेगाव नाका, गाडगेनगर, पंचवटी चौक, जयस्तंभ चौक, अंबादेवी चौक, इतवारा बाजार, नवाथे चौक, प्रभात चौक, जवाहर रोड यांसारख्या प्रमुख भागांत सातत्याने वाहतूक कोंडी होत असतानाही ट्रॅफिक पोलिस दिसत नसल्याबद्दल संताप व्यक्त करण्यात आला.शिष्टमंडळाने वाहतूक पोलिसांच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. चौकांमध्ये आवश्यकतेच्या ठिकाणी पोलिस नसतात, मात्र सुनसान रस्त्यांवर वाहनचालकांवर कारवाई करताना पोलिसांचे घोळके दिसतात, असा आरोप करण्यात आला. तसेच वाहतूक शाखेतील वरिष्ठ अधिकारी कार्यालयातच बसून राहतात व प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून परिस्थितीचा आढावा घेत नसल्याचेही सांगण्यात आले.वाहतूक नियंत्रणासाठी पोलिसांना विशेष प्रशिक्षण देण्याची गरज असल्याचे मत व्यक्त करताना, सिग्नलवरील लेन शिस्त, ट्रिपल सीट, विना नंबर प्लेट वाहने आणि बेफाम वेगावर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. घरातून बाहेर पडलेला नागरिक सुखरूप परत येईल की नाही, याची चिंता कुटुंबीयांना सतावत आहे. हे कुठेतरी थांबले पाहिजे, अशी भावना निवेदनातून व्यक्त करण्यात आली.या शिष्टमंडळात दैनिक हिंदुस्थानचे प्रबंध संपादक विलासदादा मराठे, डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. ए. टी. देशमुख, अमरावती चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष सुरेश जैन, सचिव घनश्याम राठी, वरिष्ठ अधिवक्ता के. एस. देशपांडे, ईएनटी तज्ज्ञ डॉ. बबन बेलसरे, हृदयरोग तज्ज्ञ डॉ. अजय डफळे, डॉ. अनिल रोहनकर, ॲड. बंधू खोरगडे व अतुल गायगोले आदी मान्यवर उपस्थित होते.दरम्यान, शिष्टमंडळाच्या भेटीनंतर पोलिस आयुक्त राकेश ओला यांनी स्वतः भर उन्हात रस्त्यावर उतरून वाहतूक व्यवस्थेचा आढावा घेत आवश्यक उपाययोजना सुरू केल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.-

# ३१ मे चे मंत्रालयावरील 'राहुटी आंदोलन' तात्पुरते स्थगित

## शासनाच्या सकारात्मक आश्वासनानंतर 'मेंढपाळ धनगर विकास मंच' चा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० अमरावती**



भटकंती करणाऱ्या मेंढपाळ बांधवांच्या चराई क्षेत्राचा प्रश्न, सुरक्षा आणि 'अर्धबंदिस्त मेंढीपालन प्रकल्पा'सह विविध न्याय्य मागण्यांसाठी 'मेंढपाळ धनगर विकास मंच'च्या वतीने आगामी ३१ मे २०२६ रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या जयंतीनिमित्त आझाद मैदान मुंबई येथे जयंती साजरी करून मंत्रालयासमोर राहुटी आंदोलन पुकारण्यात आले होते. मात्र शासनाने मेंढपाळ बांधवांच्या मागण्यांबाबत सकारात्मक पावले उचलण्याचे लेखी आश्वासन दिल्याने नियोजित आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात येत आहे. अशी घोषणा मंचचे संस्थापक अध्यक्ष श्री. संतोष महात्मे यांनी आज केली.कृषी मंत्री मा. ना. दत्तामामा भरणे साहेब यांचे कडून प्राप्त झालेल्या पत्रानंतर आणि शासनाने घेतलेल्या भूमिकेचा मान राखून संघटनेने हा निर्णय घेतला आहे. ३१ मे हा दिवस संपूर्ण धनगर समाज सह सर्व समाजासाठी आणि महाराष्ट्रासाठी अस्मिता, गौरव आणि उत्सवाचा दिवस आहे. या मंगलमयी दिवशी आंदोलन केल्यास कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होऊन सर्वसामान्य नागरिकांना त्रास होऊ शकतो. आराध्य दैवताच्या जयंती दिनाचे औचित्य आणि पवित्रता राखणे हे आपले आद्य कर्तव्य असल्याने आम्ही आंदोलन तात्पुरते स्थगित करीत आहोत. त्याचप्रमाणेशासकीय पातळी वरुण सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. शासनाने आमच्या निवेदनाची गंभीर दखल घेतली आहे. यापूर्वी १७ मार्च २०२६ रोजी मंत्रालयात झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत सकारात्मक चर्चा झाली असून, प्राथमिक टप्प्यात धुळे, अमरावती, बुलढाणा आणि सोलापूर या चार जिल्ह्यांमध्ये मेंढपाळ शेतकऱ्यांच्या उपजीविकेच्या गरजांचा सखोल अभ्यास करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. वरील चारही जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी, पशुसंवर्धन आणि वनविभागाला संयुक्त रित्या अहवाल तयार करण्याचे निर्देश मिळाले आहेत. त्याचप्रमाणे मा. कृषिमंत्री यांनी मा. पशुसंवर्धन मंत्री मा. पंकजाताई मुंढे यांच्याकडे उर्वरित विषयाकरिता बैठक आयोजित करण्याबाबत निर्देश दिलेल्या आहेत. ही मेंढपाळ बांधवांच्या लढ्याची पहिली पायरी आहे.शासन सध्या मेंढपाळ बांधवांच्या हितासाठी कटिबद्ध असल्याचे सांगत आहे आणि त्यांनी सकारात्मक भूमिका घेतली आहे. सरकार या प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी प्रयत्नरत आहेत. अहिल्यादेवींच्या जयंती उत्सवात कोणताही अडथळा येऊ नये म्हणून आम्ही ३१ मे चे आंदोलन स्थगित करत आहोत. मात्र, शासनाने दिलेल्या आश्वासनानुसार तात्काळ अंमलबजावणी न केल्यास आगामी काळात तीव्र आंदोलनाची दिशा ठरवली जाईल. माननीय कृषिमंत्री यांचे कडून पत्र घेतेवेळी मेंढपाळ धनगर विकास मंचचे धुळे जिल्हाध्यक्ष रमेशजी सरक तथा धुळे जिल्ह्यातील कारभारी उपस्थित होते.

# दारू आली कुठून? पुरवठादारावर कारवाई होणार का?

## सातेगाव कारवाईनंतर नवे प्रश्न उपस्थित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अंजनगाव सुर्जी**




अमरावती ग्रामीणच्या स्थानिक गुन्हे शाखेने सातेगाव परिसरात अवैध देशी दारूचा मोठा साठा जप्त करत कारवाई केली असली, तरी ही दारू नेमकी कुठून आणली जात होती आणि त्या मागील मुख्य पुरवठादारांवर कारवाई होणार का, असे अनेक प्रश्न आता उपस्थित होत आहेत.स्थानिक गुन्हे शाखेने ६७४ देशी दारूच्या पावट्या आणि एक होंडा लिव्हो मोटारसायकल असा तब्बल १ लाख ४४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. मात्र कारवाईदरम्यान आरोपी अंधार आणि जंगलाचा फायदा घेत पसार झाले. पोलिसांनी योगीराज मेश्राम याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून शोधमोहीम सुरू केली आहे.मात्र, एवढ्या मोठ्या प्रमाणात देशी दारूचा साठा कोणत्या दुकानातून किंवा कोणत्या घाऊक विक्रेत्याकडून आणण्यात आला, याबाबत अद्याप स्पष्ट माहिती समोर आलेली नाही. अवैध दारू वाहतुकीमागे केवळ वाहतूक करणारेच नव्हे, तर पुरवठा करणारे आणि आर्थिक साखळी चालवणारे मुख्य सूत्रधार असतात. त्यामुळे आता पोलिस तपासाची दिशा दारू पुरवठादारांकडे वळणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.स्थानिक नागरिकांमध्येही चर्चा सुरू असून, फक्त वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करून उपयोग नाही; दारू पुरवणाऱ्या दुकानांवर व संबंधितांवरही गुन्हे दाखल झाले पाहिजेत, अशी मागणी होत आहे.दरम्यान, पोलिस तपासातून दारूचा उगम, संबंधित दुकानदार, परवाना धारक अथवा अवैध विक्री साखळी उघड होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आता या प्रकरणात पुढे कोणत्या मोठ्या नावांचा खुलासा होतो आणि पोलिस पुढील कारवाई कोणावर करतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### फक्त पावट्या पकडून उपयोग नाही

स्थानिक नागरिकांमध्येही संताप व्यक्त होत असून,रोज रात्री गावोगावी दारू पोहोचते, मग ती येते कुठून? फक्त गाडी पकडून कारवाई पूर्ण होत नाही; मूळ पुरवठादारांवरही गुन्हे दाखल झाले पाहिजेत, अशी मागणी नागरिक करत आहेत.

# आता मेळघाटातील शिक्षक ठरणार अतिरिक्त

## शिक्षण विभागात अफलातून कारभाराचा आरोप, याचिकाकर्त्यांमध्ये संतापाची लाट



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

### प्रहार शिक्षक संघटनेचा इशारा

शिक्षण विभागाच्या कारभाराविरोधात आता कायदेशीर लढाई तीव्र होण्याची चिन्हे आहेत. प्रहार शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष महेश ठाकरे यांनी शिक्षण विभागाविरुद्ध उच्च न्यायालयात तत्काळ न्यायालय अवमान याचिका दाखल करण्याच इशारा दिला आहे. आता या संपूर्ण गोंधळात मेळघाटातील सातव्या टप्प्यातील शिक्षकांच्या भवितव्यावरच टांगती तलवार निर्माण झाली असून, वरिष्ठ प्रशासन यावर काय तोडगा काढते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### शिक्षण विभागाच्या भूमिकेवर संताप

एकीकडे मूळ याचिकाकर्त्या ४२ शिक्षकांना सपाटीवर आणण्यास टाळाटाळ करणाऱ्या शिक्षण विभागाने दुसरीकडे मात्र सातव्या टप्प्यातील ९७ शिक्षकांची बदली रद्द करून त्यांना तातडीने सपाटीवर आणण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. एकाच प्रशासनाचे दोन वेगवेगळ्या गटांसाठीचे हे दुटप्पी धोरण पाहून मूळ याचिकाकर्त्या शिक्षकांवर मोठा अन्याय होत असल्याची भावना निर्माण झाली आहे. या 'अफलातून' कारभारामुळे शिक्षण विभागाच्या हेतूवरच आता प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

मागील काही काळापासून मेळघाटातील (पेसा क्षेत्र) आणि आंतरजिल्हा बदलीने आलेल्या शिक्षकांच्या हक्काचा प्रश्न प्रलंबित असताना, शिक्षण विभागाने घेतलेल्या दुटप्पी निर्णयामुळे आता मेळघाटातील शिक्षक अतिरिक्त ठरणार का?, असा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, शिक्षक वर्गात तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

मागील वर्षी आंतरजिल्हा बदलीने जिल्ह्यात आलेल्या ४२ शिक्षकांना प्रशासनाने नियमबाह्यपणे 'पेसा' (मेळघाट) क्षेत्रात समाविष्ट केले होते. या अन्यायाविरुद्ध शिक्षकांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. नोव्हेंबर २०२५ मध्ये न्यायालयाने स्पष्ट आदेश दिले होते की, या शिक्षकांना तातडीने 'नॉन-पेसा' (सपाटीवर) क्षेत्रात समाविष्ट करण्यात यावे. मात्र, शिक्षण विभागाने तेव्हा 'बदली प्रक्रिया झाली नाही', असे तांत्रिक कारण पुढे करीत न्यायालयाचे आदेश डावलले आणि या ४२ शिक्षकांचे समायोजन जाणीवपूर्वक टाळले. सातव्या टप्प्यातील ९७ शिक्षकांना पदस्थापना देण्यापूर्वी न्यायालयाच्या आदेशानुसार आंतरजिल्हा बदलीने आलेल्या त्या ४२ याचिकाकर्त्या शिक्षकांचे सपाटीवरील रिक्त पदांवर तातडीने समायोजन करावे. पेसा क्षेत्रातील रिक्त पदांवर स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची भरती करावी तसेच तेथे कार्यरत असलेल्या बिगर आदिवासी शिक्षकांना तत्काळ मूळ प्रवाहात (सपाटीवर) आणण्यात यावे, या शिक्षकांच्या प्रमुख मागण्या आहेत.

# वर्ल्ड आर्चरी चॅम्पीयनशिपमध्ये 'सुवर्ण'भेद

## आंतरराष्ट्रीय तिरंदाज कुमकुम मोहोडचा जिल्हाधिकाऱ्यांनी केला सन्मान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**



चीनच्या शांघाय येथे पार पडलेल्या 'वर्ल्ड आर्चरी चॅम्पीयनशिप' स्टेज दोन स्पर्धेत अमरावतीची आंतरराष्ट्रीय तिरंदाज कुमकुम मोहोड हिने भारतीय महिला संघाला सुवर्णपदक मिळवून दिले. या यशाबद्दल जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या हस्ते कुमकुमचा शाल आणि पुस्तक देऊन गौरव करण्यात आला. जागतिक स्पर्धेत भारत आणि यजमान चीन यांच्यातील अंतिम सामना चार-चार, असा बरोबरीने सुटला होता. त्यानंतरच्या 'शूट-ऑफ'मध्ये कुमकुमने अचूक लक्ष्यभेद करीत चीनला पराभूत केले. या कामगिरीने भारतीय महिला संघाने पाच वर्षांनंतर पहिले सांघिक सुवर्णपदक पटकाविले. उपांत्य फेरीतही भारतीय संघाने १० वेळा ऑलिम्पिक सुवर्णपदक जिंकणाऱ्या दक्षिण कोरियाच्या संघाला पराभूत केले. या सुवर्णविजेत्या भारतीय संघात कुमकुम मोहोडसह अंकिता भगत आणि चार वेळची ऑलिम्पियन दीपिका कुमारी यांचा समावेश होता. कुमकुम ही गेल्या नऊ वर्षांपासून अमरावती जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्र, 'खेलो इंडिया' आंतरराष्ट्रीय धनुर्विद्या शूटिंग रेंजवर आंतरराष्ट्रीय क्रीडा मार्गदर्शक प्रफुल्ल डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करीत आहे. अत्यंत कमी वयाची असलेली कुमकुम सध्या फार्मात असून, तिची आगामी जूनच्या दुसऱ्या आठवड्यात तुर्की येथे होणाऱ्या वर्ल्ड कप स्टेज तीन, स्पेन (माद्रिद) येथील वर्ल्ड कप स्टेज चार आणि सप्टेंबरमध्ये जपान येथे होणाऱ्या आशियाई गेम्ससाठी भारतीय संघात निवड झाली आहे. कुमकुमसोबतच अमरावतीचा यशदीप भोगे याची देखील आशियाई गेम्ससाठी निवड झाली. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी कुमकुमची लहान वयातील ही कामगिरी पाहता, ती २०२८ मध्ये लॉस एंजेलिस येथे होणाऱ्या ऑलिम्पिक स्पर्धेत निश्चितच भारताचे प्रतिनिधित्त्व करेल आणि देशाचे नावलौकिक वाढवेल, असा विश्वास व्यक्त केला. यावेळी जिल्हा क्रीडाधिकारी गणेश जाधव, अनिल इंगळे, क्रीडा मार्गदर्शक प्रफुल्ल डांगे उपस्थित होते.

# अन्नसुरक्षा व पोषण अभियानांतर्गत शेतकऱ्यांना आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती-** खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना दर्जेदार, प्रमाणित व सुधारित बियाण्यांचा लाभ मिळावा तसेच उत्पादनवाढीस चालना मिळावी, या उद्देशाने केंद्र व राज्य शासनाच्या राष्ट्रीय अन्नसुरक्षा व पोषण अभियानांतर्गत प्रमाणित बियाणे किट वितरणासाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. मोर्शी तालुक्यातील पात्र लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी वेळेत अर्ज करावेत, असे आवाहन तालुका कृषी विभागाने केले आहे. या योजनेचा लाभ वैयक्तिक शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी (एफपीओ/एफपीसी) तसेच सहकारी संस्था यांना घेता येणार आहे. विशेष बाब म्हणजे शेतकरी गटासाठी एका गावातून केवळ एकाच गटाची निवड करण्यात येणार असून शासनाच्या निकषांनुसार पात्र गटाला लाभ दिला जाणार आहे. त्यामुळे गावातील शेतकऱ्यांनी समन्वय साधून पात्र गटामार्फत अर्ज करणे आवश्यक आहे. तसेच या योजनेसाठी अर्ज करणाऱ्या शेतकरी गटातील सर्व सदस्य शेतकऱ्यांची एग्री-स्टॅक नोंदणी असणे अनिवार्य करण्यात आले आहे. एग्री-स्टॅक नोंदणी अपूर्ण असल्यास अर्ज ग्राह्य धरला जाणार नाही. त्यामुळे अर्ज सादर करण्यापूर्वी सर्व सदस्यांनी आपली नोंदणी पूर्ण करून आवश्यक माहिती अद्ययावत ठेवावी, असे कृषी विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. पात्र लाभार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करताना आवश्यक कागदपत्रे, जमीनविषयक माहिती, आधार संलग्न माहिती तसेच एग्री-स्टॅक नोंदणीची पूर्तता करणे आवश्यक आहे. लाभार्थ्यांची निवड शासनाच्या नियमानुसार पारदर्शक पद्धतीने करण्यात येणार असून निवड झालेल्या लाभार्थ्यांना प्रमाणित बियाणे किटचा लाभ देण्यात येणार आहे. मोर्शी तालुक्यातील जास्तीत जास्त शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या व सहकारी संस्थांनी या महत्त्वपूर्ण योजनेचा लाभ घ्यावा. अर्ज प्रक्रियेसंदर्भात कोणतीही अडचण असल्यास संबंधित कृषी सहायक, कृषी पर्यवेक्षक अथवा तालुका कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन मोर्शी तालुका कृषी अधिकारी यांनी केले आहे.

# आचारसंहितेचा मनपा आमसभेला फटका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २० अमरावती-** विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्याने महापालिकेची मासिक आमसभा स्थगित करावी लागणार आहे. या सभेत धोरणात्मक निर्णय घेता येणार नसल्याने ती स्थगित करण्यात येईल, असे सभागृह नेते चेतन गावंडे यांनी सांगितले. महापालिकेची मासिक आमसभा दरमहा २० तारखेस आयोजित करण्यात येते. त्यानुसार ती बुधवारी (ता. २०) आयोजित करण्यात आली आहे. मात्र कालच विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्याने आमसभेवर बंधणे आली आहेत. त्यामुळे आयोजित सभा होणार असली तरी ती इतिवृत्त मंजूर करून स्थगित करण्यात येणार आहे. या सभेत कोणत्याही धोरणात्मक विषयावर चर्चा करता येणार नसल्याने निर्णय घेता येणार नाहीत. त्यामुळे आमसभा स्थगित करण्यात येणार आहे.



# सर्वधर्मीय व आंतरजातीय सामूहिक विवाह सोहळा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

आर्थिक अडचणीमुळे अनेक गरीब कुटुंबांना मुलामुलींचे विवाह करताना कर्जबाजारी व्हावे लागते. ही परिस्थिती टाळण्यासाठी सामाजिक न्याय विभाग व साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे बहूद्देशीय संस्थेच्या संयुक्त विद्यमाने सर्वधर्मीय आणि आंतरजातीय सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा विवाह सोहळा नऊ ऑगस्ट २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. या सामूहिक विवाह सोहळ्यात अनुसूचित जातीतील महार, मातंग, चांभार, खाटीक, मेहतर तसेच इतर मागासवर्गीय, एनटी, व्हीजे, बौद्ध, हिंदू, शीख, इसाई व इतर सर्व धर्मीय समाजातील गरजू युवक-युवती सहभागी होऊ शकतात. सामूहिक विवाहामध्ये सहभागी होणाऱ्या जोडप्यांना शासनातर्फे २५ हजारांचा लाभ दिला जाणार आहे. तसेच आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना ५० हजारांचे अनुदान मिळणार असून, अशा जोडप्यांना एकूण ७५ हजारांचा लाभ मिळू शकतो. विवाहासाठी नोंदणी करताना वधू-वरांनी टीसी, जातप्रमाणपत्र, डोमिसाईल प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, प्रथम विवाह दाखला तसेच दोन पासपोर्ट आकाराचे फोटो सादर करणे आवश्यक आहे. नोंदणीसाठी कागदपत्रे डॉ. रूपेश खडसे मोटर ड्रायव्हिंग स्कूल, प्रभादेवी मंगल कार्यालय, जुना बायपास, अमरावती येथे जमा करावीत. नोंदणीची अंतिम तारीख ३१ मे २०२६ असून, या विवाह सोहळ्यात वधू-वर व पाहुण्यांच्या जेवणाची, निवासाची तसेच विवाह हॉलची व्यवस्था संस्थेमार्फत करण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी डॉ. रूपेश खडसे किंवा पंकज जाधव यांच्यासोबत संपर्क साधण्याचे आवाहन प्रसिद्धीपत्रकाद्वारे करण्यात आले आहे.

# विधान परिषद निवडणूक: भाजपमध्ये उमेदवारीसाठी रस्सीखेच

## काँग्रेसची २२ मे रोजी मुंबईत महत्वाची बैठक, उमेदवार हि ठरणार

### महायुतीकडे २५१ जागा, मविआकडे १५२

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती–** विधान परिषदेच्या निवडणुकीची घोषणा होताच राजकीय वर्तुळात हालचालींना वेग आला आहे. भारतीय जनता पक्षात उमेदवारीसाठी तीव्र रस्सीखेच सुरू आहे. तर काँग्रेसने आपला उमेदवार निश्चित करण्यासाठी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या अध्यक्षतेखाली २२ मे रोजी मुंबईत बैठक बोलावली आहे. या बैठकीला जिल्ह्यातील सर्व वरिष्ठ नेत्यांना निमंत्रित करण्यात आले आहे.

पक्षीय बलाबलानुसार, भारतीय जनता पक्षाकडे सर्वाधिक १५० मतदार आहेत, तर काँग्रेस १२० मतदारांसह दुसऱ्या क्रमांकावर आहे. महायुतीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (३३), युवा स्वाभिमान (२६), प्रहार (२१), शिंदेसेना (१८) आणि बसप (०३) या पक्षांचा समावेश असून, त्यांचे एकूण संख्याबळ २५१ वर पोहोचले आहे. दुसरीकडे, काँग्रेसचे मित्रपक्ष असलेल्या उद्धवसेनेचे २१ आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे ११ सदस्य एकत्र केल्यास महाविकास आघाडीचा आकडा १५२ पर्यंत जातो. यामुळे महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात सुमारे १०० जागांचे मोठे अंतर आहे.



भाजपमध्ये या मतदारसंघाचे यापूर्वी दोन वेळा प्रतिनिधित्व केलेले माजी पालकमंत्री प्रवीण पोटे यांचे नाव आघाडीवर आहे. अलीकडेच भाजपचे शहराध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांचे नावही जोरदारपणे चर्चेत आले असून, महायुतीतील घटक पक्ष युवा स्वाभिमान त्यांना खंबीरपणे पाठिंबा देत आहे. याशिवाय आणखी काही नावेही चर्चेत असून, येत्या काही दिवसांत उमेदवारीवर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे.

काँग्रेसमध्ये अद्याप कोणत्याही उमेदवाराचे नाव समोर आलेले नाही. पक्षाकडून 'अर्थ'पूर्ण संबंध जपणाऱ्या उमेदवाराचा शोध सुरू असल्याचे बोलले जात आहे. याच संदर्भात २२ मे रोजी मुंबईत होणाऱ्या बैठकीत शहराध्यक्ष बबलू शेखावत, ग्रामीण अध्यक्ष बबलू देशमुख आणि जिल्ह्यातील इतर प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत.

### पक्षाकडून 'अर्थ'पूर्ण संबंध जपणाऱ्या उमेदवाराचा शोध सुरू

हा मतदारसंघ गेल्या चार निवडणुकांपासून भाजपकडेच आहे. मागील दोन निवडणुकांमध्ये प्रवीण पोटे यांनी या मतदारसंघाचे नेतृत्व केले, तर त्यापूर्वीच्या दोन निवडणुका भाजपचे तत्कालीन नेते जगदीश गुप्ता यांनी जिंकल्या होत्या. या सर्व निवडणुकांमध्ये काँग्रेस प्रतिस्पर्धी पक्ष म्हणून मैदानात होता, परंतु सर्वाधिक मतदार संख्या असूनही हा मतदारसंघ जिंकण्यात त्यांना यश आले नाही, हे वास्तव आहे.

# अचलपूर कृषी विभागाच्या नवीन इमारत बांधकामास लवकरच मिळणार मंजुरी

## आमदार प्रवीण तायडे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२० अमरावती**
अचलपूर तालुक्यातील कृषी विभागाच्या नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाचा प्रश्न अखेर मार्गी लागण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल पडले असून, या कामास लवकरच मंजुरी मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यासाठी स्थानिक आमदार प्रवीण तायडे यांनी शासन स्तरावर सातत्याने केलेल्या प्रभावी पाठपुराव्याला यश मिळत असल्याचे चित्र आहे.

अचलपूर तालुक्यातील शेतकरी, कृषी अधिकारी व कर्मचाऱ्यांना अनेक वर्षांपासून स्वतंत्र व सुसज्ज इमारतीची आवश्यकता भासत होती. विद्यमान सुविधांच्या मर्यादा लक्षात घेता आधुनिक सोयी–सुविधांनी युक्त



नवीन इमारत उभारण्याची मागणी सातत्याने होत होती. या पार्श्वभूमीवर आमदार प्रवीण तायडे यांनी संबंधित विभाग, वरिष्ठ अधिकारी तसेच मंत्रालय स्तरावर वारंवार पाठपुरावा करून हा विषय प्राधान्याने मांडला.त्यांच्या प्रयत्नांमुळे प्रस्तावाला सकारात्मक गती मिळाली असून, प्रशासकीय प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.मंजुरीनंतर अचलपूर येथे कृषी विभागाची आधुनिक प्रशासकीय इमारत उभारली जाणार असून, त्यामुळे शेतकरी बांधवांना विविध कृषी योजनांचा लाभ अधिक सुलभपणे मिळणार आहे. तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांनाही प्रशासकीय कामकाजासाठी सुसज्ज सुविधा उपलब्ध होणार आहेत.या घडामोडीमुळे अचलपूर तालुक्यातील शेतकरी व नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, आमदार प्रवीण तायडे यांच्या पाठपुराव्याचे सर्व स्तरातून स्वागत करण्यात येत आहे.

# गोवंश वाहतूक करणाऱ्या ब्रिझा कारची दुचाकीला धडक; दोघे गंभीर, चालक फरार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०तिवसा** राष्ट्रीय महामार्गालगत पाईप कारखान्या जवळ आज सकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात दुचाकीस्वार दोन जण गंभीर जखमी झाले असून अपघातानंतर कारचालक फरार झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नागपूरहून अमरावतीकडे भरधाव वेगाने जात असलेल्या चक १२ थन १६७३ क्रमांकाच्या ब्रिझा कारचा टायर अचानक फुटल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. यामुळे कारने समोरून जात असलेल्या दुचाकी (चक २७ उ्ख ०६६८) ला मागून




जोरदार धडक दिली. या अपघातात वणी ममदापूर येथील प्रफुल श्रीकृष्ण लवणकर (वय ४५) व मोहित विजयराव पुनसे (वय १५) हे गंभीर जखमी झाले. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतकार्य करत जखमींना तिवसा उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी अमरावती येथे हलविण्यात आले.दरम्यान,अपघातानंतर संबंधित ब्रिझा कारमध्ये गोवंशाची अवैध वाहतूक सुरू असल्याचे उघडकीस आले. वाहनात एकूण पाच गायी आढळून आल्या असून त्यापैकी तीन गायींचा घटनास्थळी मृत्यू झाला, तर उर्वरित दोन गायींवर उपचार सुरू आहेत.याशिवाय, संबंधित वाहनावर तीन वेगवेगळ्या नंबर प्लेट आढळून आल्याने प्रकरण अधिकच संशयास्पद बनले आहे. अपघातानंतर चालक घटनास्थळावरून पसार झाला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक गोपाल उपाध्याय यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून दोषींवर कठोर कारवाईची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# दर्यापूर काँग्रेसचा राहिला असता; पण चौकडीच्या स्वार्थामुळे मतदारसंघ गेला

## सुधाकरराव भारसाकळे यांचा बबलू देशमुख व वीरेंद्र जगतापांवर घणाघात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०दर्यापूर**
दर्यापूर विधानसभा मतदारसंघ काँग्रेसच्या हातून जाण्यासाठी पक्षातील काही नेत्यांचा स्वार्थी कारभार कारणीभूत ठरल्याचा गंभीर आरोप माजी आमदार सुधाकरराव भारसाकळे यांनी केला. खासदार बळवंतराव वानखेडे यांना मतदारसंघातून स्वत:च्या पत्नीला किंवा पुतण्याला उमेदवारी द्यायची होती. मात्र त्यात अडथळे निर्माण झाल्यानंतर आपल्याला मिळत नाही तर कुणालाच मिळू नये या भूमिकेतून त्यांनीच मतदारसंघ सोडून दिला, असा आरोप भारसाकळे यांनी केला.सर्वांनी एकत्र प्रयत्न केले असते तर दर्यापूर मतदारसंघ काँग्रेसकडे कायम राहिला असता, असे सांगताना त्यांनी जिल्हा काँग्रेसमधील तथाकथित



चौकडीवरही जोरदार टीका केली. जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांच्यावर निशाणा साधत, जिल्हा काँग्रेस अध्यक्षपद, जिल्हा परिषद अध्यक्षपद, जिल्हा बँक अध्यक्षपद सर्व काही त्यांनाच पाहिजे. पदांचा हव्यास इतका वाढला आहे की इतरांना संधीच दिली जात नाही, असा आरोप त्यांनी केला.जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदावरून स्वत:ला हटवण्यात आल्याबद्दलही भारसाकळे यांनी नाराजी व्यक्त केली. मी अध्यक्ष असताना बँकेत मजबूत बॉडी उभी केली, दर्यापूरातील उमेदवार निवडून आणले. तरीही वीरेंद्र जगताप यांना अध्यक्ष करण्यासाठी माझा राजीनामा घेतला गेला, असे ते म्हणाले.प्रताप अडसडांकडून पराभवानंतर मतदारसंघात फिरण्यासाठी बँकेची गाडी मिळावी, हा वीरेंद्र जगताप यांचा अट्टाहास होता, असा आरोपही त्यांनी केला. काँग्रेसमधील काही नेते कार्यकर्त्यांचा फक्त वापर करून घेतात आणि काम झाल्यावर त्यांना बाजूला सारतात, अशी खंत व्यक्त करत त्यांनी पक्ष नेतृत्वावरही अप्रत्यक्ष नाराजी व्यक्त केली.

# खर्चाच्या तुलनेत हमीभावात तोकडी वाढ

## उत्पादन खर्च, वाढलेल्या महागाईचा सरकार दरबारी विचारच नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**
नुकतेच केंद्र शासनाने प्रत्येक पिकाचा हमीभाव जाहीर केला. पण हा हमीभाव जाहीर करताना त्या पिकाचा उत्पादन खर्च, वाढलेली महागाई याचा विचार केलेला दिसत नाही. वाढलेल्या उत्पादन खर्चाच्या तुलनेत जाहीर केलेला हमीभाव हा अतिशय तोकडा आहेत.

कुठल्याही शेतमालाचे भाव पडत असताना त्याला हमीभाव हा मोठा आधार असतो. अनेकवेळा हमीभावामुळेच शेतकरी तरला आहे. हमीभावाचा आधार शेतकर्!याला असल्यामुळेच व्यापारीसुद्धा शेतमालाला त्या तुलनेत भाव देतात. नुकतेच केंद्र सरकारने जाहीर केलेल्या हमीभावात कापसामध्ये ५५७ रुपये, सोयाबीनमध्ये ३८० रुपये तर तुरीमध्ये ४५० रुपये क्विंटलमागे वाढवलेले आहेत. राळेगाव शहरासह तालुक्यात बहुतांश हीच पिके घेतल्या जातात. पण अलीकडच्या काळामध्ये या पिकावर होणारा उत्पादन खर्च, मिळणारे उत्पन्न त्याला मिळणारा बाजार भाव, याचा विचार केला तर केंद्र सरकारने जाहीर केलेला हमीभाव हा अतिशय कमी आहे. सद्यस्थितीत डिझेलचे भाव वाढले आहेत. त्यामुळे उन्हाळी वाईचा खर्च वाढलेला आहे. पेट्रोल डिझेलचे दर वाढल्याने महागाई ही वाढणारच, सोबतच बियाणे फवारणी, औषधी, मजुरी या सर्वच खर्चात वाढ होणार आहे. युरिया व डीएपी वगळता इतर खतांमध्ये ३०० ते ४०० रुपयांची गोणीमागे वाढ झालेली



आहे. खतामध्ये गोणीमागे जेवढी वाढ झाली, साधारणत: तेवढाच हमीभाव क्विंटलमागे वाढलेला

खरीप हंगामामध्ये वाढणार महागाई केंद्र सरकारने कापसामध्ये क्विंटलमागे ५५७ सोयाबीनमध्ये ३८० रुपये तर तुरीमध्ये केवळ ४५० रुपये वाढवले, ही वाढ खताच्या एक गोणीमध्ये झालेल्या वाडी एवढीच आहे, त्यामुळे येत्या खरीप हंगामामध्ये सर्वच वस्तुंच्या किमती वाढण्याची दाट शक्यता आहे. येणार्!या खरीप हंगामामध्ये महागाई तसेच खताच्या वाढलेल्या किमतीने शेतकर्!याचा उत्पादन खर्च हा प्रचंड वाढणार आहे, त्या तुलनेत हमीभाव कमी असल्याने शेतकर्!यांचे आर्थिक नुकसान होणार, एवढे निश्चित.आहे. एकरी खताचा विचार केला तर अनेक गोणी खत शेतकर्!याला लागते. म्हणजे महागाईचा विचार करून केंद्र शासनाने हमीभाव वाढवलेला नाही. हमीभाव जाहीर करताना सरकारने उत्पादन खर्चावर किमान ५० टक्के नफा गृहीत धरून हमीभाव जाहीर करायला पाहिजे होता.

स्वामीनाथन आयोगाने उत्पादन खर्चाच्या दीडपट हमीभाव देण्याची शिफारस करताना हा उत्पादन खर्च सर्व समावेशक असावा, अशी अपेक्षा केलेली होती. उत्पादन खर्च काढताना एखादे पीक घेताना बियाणे, खते, रासायनिक कीटकनाशके, मजूर, सिंचन, इंधन सोबतच शेतकरी आणि त्याच्या कुटुंबियांनी शेतात केलेल्या कामाची मजुरी, त्याबरोबरच जमिनीचे आभासी भाडे खंड आणि स्थायी भांडवली साधनसामुग्रीवरील व्याज हे सर्व गृहीत धरून केंद्र सरकारने हमीभाव जाहीर करायला पाहिजे होता. पण तसे केलेले दिसत नाही.

# नीट पेपरफुटी प्रकरणाचे विदर्भात पडसाद; अमरावतीही सीबीआयच्या रडारवर?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती :**
देशभरात चर्चेचा विषय ठरलेल्या नीट पेपरफुटी प्रकरणाचा तपास आता विदर्भातही वेगाने पोहोचला असून केंद्रीय अन्वेषण ब्युरो (सीबीआय)ने महाराष्ट्रातील तपासाची व्याप्ती वाढविली आहे. नांदेड, लातूर, नाशिक आणि पुणे येथील कारवाईनंतर आता नागपूर आणि चंद्रपूर येथे छापे टाकण्यात आल्याने अमरावतीतही खळबळ उडाली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, अमरावतीसह विदर्भातील काही शहरांवर तपास यंत्रणांचे लक्ष केंद्रीत झाले असून, येत्या काही दिवसांत मोठी कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.मंगळवारी सकाळी सीबीआयच्या पथकाने नागपूरच्या गणेशपेठ आणि कोतवाली पोलीस ठाण्यांच्या हद्दीत राहणाऱ्या दोन विद्यार्थ्यांच्या घरांवर छापे टाकले. विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांची चौकशी करण्यात आली. तसेच चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी तालुक्यातील एका विद्यार्थ्याच्या घरीही तपास करण्यात आला. प्राथमिक तपासात हे तिन्ही विद्यार्थी लातूरमधील प्रसिद्ध कोचिंग संचालक शिवराज मोटेगावकर यांच्या संस्थेशी संबंधित असल्याची माहिती समोर आली आहे.या घडामोडींनंतर राज्यभरातील प्रवेश एजन्सी, कोचिंग क्लासेस आणि संशयित दलालांच्या हालचालींवर तपास यंत्रणांनी बारीक लक्ष ठेवण्यास सुरुवात केली आहे. विदर्भातील शैक्षणिक केंद्र म्हणून ओळख असलेल्या अमरावतीत मोठ्या प्रमाणावर नीट आणि स्पर्धा परीक्षांच्या कोचिंग संस्था कार्यरत आहेत. त्यामुळे या प्रकरणाशी संबंधित कोणते धागेदोरे येथेही सापडतात का, याची पडताळणी होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.सूत्रांच्या माहितीनुसार, ३ मे




रोजी झालेल्या नीट परीक्षेच्या तब्बल ४२ तास आधी काही कोचिंग संस्थांकडे प्रश्नपत्रिका पोहोचल्याचा संशय आहे. या प्रकरणात आतापर्यंत सीबीआयने पाच राज्यांत छापे टाकून १० आरोपींना अटक केली आहे. कोचिंग ऑपरेटर, प्रवेश एजन्सी आणि प्रश्नपत्रिका खरेदी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या नेटवर्कचा शोध घेण्यासाठी दिल्ली, जयपूर, गुरुग्राम, पुणे, नाशिक, लातूर आणि अहिल्यानगरसह विविध शहरांत तपास मोहीम सुरू आहे.अमरावतीतील कोचिंग संस्थांमध्ये सध्या अस्वस्थतेचे वातावरण असून, तपासाच्या हालचालींमुळे शैक्षणिक क्षेत्रात चर्चांना उधाण आले आहे.

# सात जण ताब्यात : घातक शास्त्रे जप्त

## गुन्हे शाखेची विशेष मोहीम

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२० अमरावती – पोलिस आयुक्तालयाच्या गुन्हे शाखेच्या पथकाने विशेष मोहीम राबवून सात जणांना ताब्यात घेतले असून त्यांच्या जवळून घातक शस्त्रे जप्त करण्यात आली. पोलिस आयुक्तांनी गुन्हे शाखेची विशेष बैठक बोलवून आयुक्तालय हद्दीमधील शरीराविरुद्ध गुन्हे करणाऱ्या तसेच अवैधरीत्या घातक शस्त्रे बाळगणाऱ्या गुन्हेगारांवर योग्य ती कारवाई करण्याबाबत आदेशित केले होते. त्यावरून गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात गुन्हे शाखेच्या पथकाने कारवाईचा धडाका लावला आहे. विशेष मोहीम राबवून वेगवेगळ्या पोलिस ठाण्यांच्या हद्दीमधून एकूण सहा ठिकाणी कारवाई करून सात जणांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या ताब्यातून सात घातक शस्त्रे जप्त करून त्यांच्याविरुद्ध आर्म ॲक्ट कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात आले. पोलिस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त श्याम घुगे, रमेश धुमाळ, शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनात गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ही कारवाई केली.

# जनगणना पर्यवेक्षक प्रा. समीर बिजवे यांना कारणे दाखवा नोटीस

## कर्तव्यात कसूर व प्रगणकाला शिवीगाळ प्रकरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अंजनगाव सुर्जी–** आगामी जनगणनेच्या कामात निष्काळजीपणा करणे आणि माहिती विचारणाऱ्या प्रगणकालाच थेट फोनवर शिवीगाळ करण्याचा धक्कादायक प्रकार अंजनगाव सुर्जी येथे उघडकीस आला आहे. याप्रकरणी मुख्यधिकारी तथा चार्ज अधिकारी यांनी श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालयाचे प्राध्यापक तथा जनगणना पर्यवेक्षक प्रा. समीर बिजवे यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. २४ तासांच्या आत समाधानकारक खुलासा सादर न केल्यास जनगणना अधिनियम १९४८ नुसार कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा देण्यात आल्याने तालुक्यातील कर्मचारी वर्गात तीव्र खळबळ उडाली आहे.

प्राप्त माहितीनुसार, जनगणनेसाठीप्रा. समीर बिजवे यांची पर्यवेक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मात्र, नियुक्ती झाल्यापासून त्यांनी त्यांच्या अधिनिस्त प्रगणकांना कोणतीही माहिती दिली नाही, अथवा त्यांच्याशी कोणताही समन्वय साधला नाही. याबाबतची माहिती घेण्यासाठी आणि कामाचे नियोजन समजून घेण्यासाठी जनगणना प्रगणक रवींद्र भागवत यांनी प्रा. बिजवे यांच्याशी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधला. मात्र, कामाची माहिती देण्याऐवजी प्रा. बिजवे यांनी प्रगणक भागवत यांना फोनवरच शिवीगाळ केली. पर्यवेक्षकाकडून मिळालेल्या या अपमानास्पद वागणुकीमुळे प्रगणक रवींद्र भागवत यांनी तात्काळ या घटनेची लेखी माहिती अंजनगाव सुर्जीचे मुख्याधिकारी तथा

चार्ज अधिकारी यांच्याकडे पत्राद्वारे दिली. शासकीय कामात अडथळा निर्माण करणे आणि सहकाऱ्याला शिवीगाळ करणे हा गंभीर प्रकार असल्याचे लक्षात घेऊन मुख्याधिकाऱ्यांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेतली. मुख्याधिकाऱ्यांनी प्रा. समीर बिजवे यांना नोटीस बजावून २४ तासांच्या आत या वर्तनाचा लेखी खुलासा सादर करण्याचे आदेश दिले आहेत. मुदतीत खुलासा सादर न केल्यास, जनगणना अधिनियम १९४८ च्या कलम ११ व १२ मधील तरतुदींनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे या पत्रात स्पष्ट करण्यात आले आहे. या कडक भूमिकेमुळे तालुक्यातील जनगणना पर्यवेक्षक आणि प्रगणकांच्या गोटात सध्या मोठी खळबळ उडाली आहे.